# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः03.07.2025** **वारःगुरुवार**

---

1. पंतप्रधान नरेंद्र मोदी आज दौऱ्याच्या दुसऱ्या टप्प्यात त्रिनीदाद आणि टोबॅगोला भेट देणार
2. पहलगाम दहशतवादी हल्ल्यातले आरोपी, संघटना आणि त्यांना आर्थिक मदत पुरवणाऱ्यांवर कडक कारवाई करण्यात यावी- क्वाड सदस्य देशांचं आवाहन
3. अमेरिकेत शिक्षणासाठी जाणाऱ्या विद्यार्थ्यांना आता व्हिसासाठी अर्ज करता येणार आणि
4. एजबॅस्टन इथं दुसऱ्या कसोटी सामन्यात पहिल्या दिवसअखेर भारताच्या 5 बाद 310 धावा

**<u>पंतप्रधान दौरा</u>**

पंतप्रधान नरेंद्र मोदी सध्या पांच देशांच्या दौऱ्यावर असून, या दौऱ्याच्या दुसऱ्या टप्प्यात ते आज त्रिनिदाद आणि टोबॅगो ला पोहोचणार आहेत. यावेळी ते त्रिनीदाद आणि टोबॅगो च्या अध्यक्षा क्रिस्टीन कार्ला कांगालू आणि पंतप्रधान कमला प्रसाद बिसेसर यांच्याशी द्विपक्षीय संबंध मजबूत करण्यावर चर्चा करतील. त्रिनीदाद आणि टोबॅगो मध्ये भारतीय स्थलांतरितांच्या आगमनाला यावर्षी 180 वर्ष पूर्ण होत असल्यानं ही भेट ऐतिहासिक असल्याचं पंतप्रधान यावेळी म्हणाले. तत्पूर्वी काल पंतप्रधानांनी घानाचे अध्यक्ष जॉन महामा यांच्याशी अक्रा इथल्या ज्युबली हाऊस इथं द्विपक्षीय बैठक घेतली. दोन्ही नेत्यानी द्विपक्षीय संबंध करण्याच्या विविध मार्गांवर चर्चा केली. या चर्चेनंतर सांस्कृतिक देवाणघेवाण आणि पारंपारिक संगीत याक्षेत्रांसह चार सामंजस्य करयारांवर स्वाक्षरी केली. भारत घाना भागीदारीला व्यापक स्वरूप देण्याचा निर्णय यावेळी पंतप्रधान मोदी यांनी घेतला.

**<u>क्वाड संयुक्त निवेदन</u>**

पहलगाम दहशतवादी हल्ल्यातले आरोपी, त्यांची संघटना आणि त्यांना आर्थिक मदत पुरवणारे या सगळ्यांवर तत्काळ कायदेशीर कारवाई केली जावी असं आवाहन क्वाड सदस्य देशांनी केलं आहे. संयुक्त राष्ट्रांच्या सदस्य देशांनी यासाठी सहकार्य करावं अशी विनंतीदेखील सदस्य देशांनी केली. क्वाड सदस्य देशांच्या परराष्ट्र मंत्र्यांची अमेरिकेत बैठक झाल्यानंतर एक संयुक्त निवेदन जारी करण्यात आलं. या निवेदनात पहलगाम घटनेचा तीव्र शब्दांत निषेध करण्यात आला आहे. क्वाड देशांनी खुल्या आणि मुक्त हिंद-प्रशांत महासागर क्षेत्राबद्दलची आपली वचनबद्धता पुन्हा बोलून दाखवत पूर्व आणि दक्षिण चीन समुद्रातील सध्याच्या स्थितीबाबत चिंता व्यक्त केली आहे. या क्षेत्रातील कायद्याची अंमलबजावणी, सार्वभौमत्व आणि प्रादेशिक अखंडता कायम राखण्याप्रतीही आपण वचनबद्ध आहोत असं या निवेदनात म्हटलं आहे.

**<u>जयशंकर</u>**

पाकिस्तानमुळं अमेरिकेशी असलेल्या भारताच्या संबंधांवर परिणाम होत नाही, असं परराष्ट्रमंत्री एस.जयशंकर यांनी वॉशिंग्टन मध्ये एका पत्रकार परिषदेत बोलताना सांगितलं. भारत- अमेरिका संबंध हे तिसऱ्या देशावर नाही तर परस्पर हितसंबंधांवर आधारित असल्याचं ते म्हणाले. भारत आणि अमेरिकेचे संबंध हे व्यापार, गुंतवणूक, तंत्रज्ञान, ऊर्जा आणि गतिशीलता यावर आधारित आहेत त्यामुळं आपण स्वतःची व्याख्या करताना इतरांशी तुलना करणं थांबवलं पाहिजे. असंही ते यावेळी बोलताना म्हणाले. ऑपरेशन सिंदूर नंतर युद्धबंदीसाठी भारत आणि पाकिस्तानमध्ये मध्यस्थी केल्याचा अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प

यांचा दावाही जयशंकर यांनी फेटाळून लावला. युद्धबंदीसाठी दोन्ही नेत्यांनी थेट वाटाघाटी केल्या असल्याचं त्यांनी यावेळी स्पष्ट केलं.

**वैष्णव-परिषद**

प्रसारण आणि माध्यम तंत्रज्ञानावरील 29 व्या आंतरराष्ट्रीय परिषद आणि प्रदर्शनाचं उद्घाटन माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांच्या हस्ते आज नवी दिल्ली इथं होत आहे. कृत्रिम बुद्धिमत्तेद्वारे माध्यम परिदृष्याचे रूपांतर: निर्मिती, सहयोग आणि कमाई असा या वर्षीच्या परिषदेचा विषय आहे. तीन दिवसांच्या या परिषदेदरम्यान, देश-विदेशातील प्रख्यात प्रसारक, माध्यम उद्योग व्यवसायिक आणि वक्ते व्याख्यानं देतील आणि अत्याधुनिक प्रसारण विषयांवर चर्चा करतील. प्रदर्शनात, जगभरातील प्रसारण उपकरणांचे उत्पादक, प्रसारण व्यवसायिक आणि सेवा पुरवठादार नवीनतम उत्पादनं, अत्याधुनिक तंत्रज्ञान आणि सेवा प्रदर्शित करतील.

**रिजिजू सेशन**

राष्ट्रपति द्रौपदी मुर्मू यांनी 21 जुलै ते 21 ऑगस्ट या कालावधीत संसदेचं पावसाळी अधिवेशन बोलवण्याच्या सरकारच्या प्रस्तावाला मान्यता दिली असल्याची माहिती संसदीय कार्यमंत्री किरेन रिजिजू यांनी आपल्या समाज माध्यमांवरील संदेशामधून दिली आहे. स्वातंत्र्य दिनाच्या पार्श्वभूमीवर 13 आणि 14 ऑगस्टला कोणतंही अधिवेशन होणार नसल्याचंही त्यांनी या संदेशात म्हटलं आहे.

**युएस व्हिसा**

अमेरिकेत शिक्षणासाठी जाणाऱ्या विद्यार्थ्यांना आता व्हिसासाठी अर्ज करता येणार असल्याचं अमेरिकेच्या परराष्ट्र विभागाचे उपप्रवक्ते मिगनॉन हयुस्टन यांनी जाहीर केलं आहे. सर्व व्हीआय निर्णय हे राष्ट्रीय सुरक्षेवर आधारित असून विद्यार्थ्यानी त्यांचा व्हिसा अभ्यासाच्या उद्देशासाठीच वापरावा आणि नियमंच काटेकोर पालन करावं, असं पत्रकारांशी बोलताना हयूस्टन यांनी सांगितलं. विद्यार्थ्यानी इथे शिक्षण घेण्यासाठी यावं यावेळी इथल्या कोणत्याही मालमत्तेचं नुकसान होऊन अडथळा निर्माण होईल असं कोणताही कृती करू नये. हे धोरण अमेरिकेचे नागरिक आणि विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी टायर करण्यात आलं असल्याचं त्यांनी सांगितलं.

**उत्तराखंड पर्यटक**

उत्तराखंडमध्ये उत्तरकाशी इथं गेलेले राज्यातले सर्व पर्यटक सुरक्षित असल्याचं प्रशासनानं कळवलं आहे. हे सगळे पर्यटक जानकीचट्टी इतं असून त्यांच्या राहण्याची, जेवणाची आणि वैद्यकीय मदतीची व्यवस्था उत्तराखंड सरकारनं केली आहे. दरम्यान, या पर्यटकांशी काल महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दूरध्वनीवरुन संवाद साधला आणि काही अडचण आल्यास त्वरित संपर्क साधा असं सांगितलं. उत्तराखंडच्या मुख्यमंत्र्यांसोबतही शिंदे यांनी संपर्क साधला. राज्यातले दीडशे पर्यटक उत्तराखंडमध्ये अडकले आहेत.

**अमरनाथ यात्रा**

दरवर्षी 38 दिवस चालणाऱ्या अमरनाथ यात्रेला दक्षिण काश्मीर मधील पाहलगाम आणि मध्य काश्मीर मधल्या गंदरबाल जिल्ह्यातील बालताल या दोन मार्गांवरून कडक सुरक्षाव्यवस्थेमध्ये आज सुरुवात होत आहे. अमरनाथ गुहा 12 हजार 756 फुट उंचीवर आहे. बालताल मार्गावर 2300 यात्रेकरू आणि पाहलागाम मार्गावर 3 हजार पेक्षा अधिक यात्रेकरूंना घेऊन सुमारे 300 वाहनं श्रीनगर जम्मू राष्ट्रीय महामार्गावरून काश्मीर खोऱ्यात पोहोचली. यावेळी स्थानिक जनता,नागरी समाजाचे सदस्य आणि जिल्हा प्रशासनानं यात्रेकरूंचं भव्य स्वागत केलं. तसंच काल उपराज्यपाल मनोज सिन्हा यांनी भाविकांच्या पहिल्या तुकडीला हिरवा झेंडा दाखवला, आणि भाविकांना शुभेच्छा दिल्या.

**मिथेन उत्सर्जन**

जागतिक मिथेन उत्सर्जनाचं निरीक्षण करण्यासाठी वापरण्यात येणारा मिथेनसॅट हा उपग्रह पृथ्वीशी संपर्क तुटल्यानंतर अवकाशात नाहीसा झाला आहे. गेल्या वर्षी मार्चमध्ये प्रक्षेपित करण्यात आलेल्या या उपग्रहाला सतत तांत्रिक समस्या येत राहिल्या आणि तो आता शांत झाला आहे. या मोहिमेला 120 हून अधिक राष्ट्रं आणि 50 तेल आणि वायू कंपन्यांनी पाठिंबा दिला होता. मिथेन वायू कार्बनडाय ऑक्साईडपेक्षा 80 पट जास्त शक्तिशाली हरितगृह वायू आहे. हा उपग्रह नाहीसा होणं म्हणजे हवामानापुढील एक मोठे संकट असल्याचं तज्ज्ञांचं मत आहे.

**खो खो फेडरेशन**

खो खो फेडरेशन ऑफ इंडियानं नवनिर्वाचित प्रशासकीय मंडळाची काल घोषणा केली. सुधांशू मित्तल यांची अध्यक्षपदी पुन्हा निवड झाली आहे, तर उपकार सिंग विर्क हे नवे सरचिटणीस आहेत. प्रशासकीय मंडळात आठ उपाध्यक्ष, चार संयुक्त सचिव आणि 13 कार्यकारी सदस्यांचा समावेश आहे. अश्विनी पाटील आणि मोनिका या दोघी खेळाडू आयोगाचं प्रतिनिधित्व करतील. सध्या 58 देशांमध्ये खेळला जाणारा खो खो यावर्षी 90 देशांमध्ये विस्तारण्याचं उद्दिष्ट आहे.

**फुटबॉल आशियाई कप**

थायलंड मधील चियांगमाई इथल्या 700 व्या वर्धापन दिन मैदानावर झालेल्या एएफसी महिला फूटबॉल आशियाई कप 2026 च्या पात्रता फेरीत भारतानं इराकवर 5-0 असा दमदार विजय मिळवला. संघ थायलंड विरुद्धच्या पुढील सामन्यात आणखी चांगला खेळ करण्याची आणि आशियाई कप साठी पात्रता मिळवण्याची तयारी करेल, असं देशासाठी पहिलं गोल करणाऱ्या निर्मल देवी हीनं म्हटलं आहे.

**क्रिकेट**

एजबॅस्टन इथं दुसऱ्या कसोटी सामन्यात पहिल्या दिवसअखेर भारतानं इंग्लंडविरुद्ध पाच बाद 310 धावा केल्या. कर्णधार शुभमन गिल 114 धावांसह आणि रवींद्र जडेजा 41 धावांसह खेळत आहेत. जसप्रीत बुमराहला विश्रांती देऊन वेगवान गोलंदाज आकाश दीप पदार्पण करत आहे. शार्दुल ठाकूर आणि साई सुदर्शन यांच्या जागी वॉशिंग्टन सुंदर आणि नितीश कुमार रेड्डी यांचाही समावेश केला आहे.

**उत्तराखंड पाऊस**

हिमाचल प्रदेशात मुसळधार पाऊस, भूस्खलन आणि ढगफुटीच्या घटनांमुळं मोठ्या प्रमाणात जीवित आणि वित्तहानी झाली आहे. गेल्या महिन्याच्या 20 तारखेपासून 62 जणांचा मृत्यू झाला आहे आणि 56 जण अजूनही बेपत्ता आहेत. हवामान खात्यानं 8 जुलैपर्यंत राज्यात अनेक ठिकाणी मुसळधार ते अतिमुसळधार पाऊस पडण्याची शक्यता वर्तवताना प्रतिकूल हवामान परिस्थिती कायम राहण्याचा इशारा दिला आहे.

**हवामान**

भारतीय हवामानशास्त्र विभागानं आज अरुणाचल प्रदेश, पूर्व मध्य प्रदेश, पूर्व राजस्थान, गुजरात, हिमाचल प्रदेश, कोकण, गोवा, मध्य महाराष्ट्र, नागालँड, मणिपूर, मिझोराम आणि त्रिपुरामध्ये काही ठिकाणी मुसळधार ते अतिमुसळधार पावसाचा अंदाज वर्तवला आहे.

# याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं, नमस्कार.